ISSN 2278-8808
SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# संगीत, नृत्य आणि कला : अध्यापनाच्या पद्धती

उमाकांत देशमुख & डॉ. गौतम लोंढे *(Page 158-164)*
सहा. प्रा. सी. एस. एस. एम.चेंबूर, मुंबई - ७१.
सह. प्रा. एस, एन, डी, टी, शिक्षणशास्त्र महाविध्यालय, पुणे.

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

***ABSTRACT***

*शिक्षणात अध्ययन - अध्यापन प्रक्रिया ही महत्वाची बाब असून, ती अधिक सक्षम करण्यासाठी कला शिक्षणाची कास धरणे सध्याच्या युगात अत्यंत गरजेचे आहे. आपण बघतोच आहे की प्रसार माध्यम हे क्षेत्र जलद गतीने विकसित होत असून नव्या पिढीला घडवतांना फक्त नौकरी तसेच व्यवसायाचेच शिक्षण देवून भागणार नाही तर त्यांना त्यात अधिक यशस्वी होण्यासाठीत्यांना गुण आणि कौशल्या सोबतच कला शिक्षण आणि तेही शक्य तितक्या परिपूर्णपणे देणे ही शिक्षणाची जबाबदारी आहे. त्या करीता आपणास शिक्षणशास्त्र महाविध्यालयातून किती सक्षम कला, गुण आणि कौशल्या सहित शिक्षक शिक्षण क्षेत्रास देवू शकू यावर विचारमंथन करून एक सर्वगुणसंपन्न असा शिक्षक घडविण्याचे उत्तरदायित्व आज आपल्यावर आलेले आहे. ते आपण समर्थपणे पार पाडण्यासाठी कला शिक्षण देतांना कोणत्या विविध मार्गांचा पद्धतींचा उपयोग प्रत्यक्षपणे केला पाहिजे त्यावर प्रकाश टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.*
*कला शिक्षण ही अध्ययन - अध्यापनातील एक महत्वाची प्रक्रिया आहे. कले मध्ये एकूण ६४ कलांचा उल्लेख असून सध्याच्या युगात जाहिरात ही ६५ वी कला संबोधण्यात येते. कला शिक्षण क्षेत्रात जे प्रचंड परिवर्तन घडते आहे, जे नवेनवे विचारप्रवाह निर्माण होत आहेत आणि ज्या नव्या अध्यापन पद्धती शोधल्या जात आहेत, त्यांची माहिती विध्यार्थी शिक्षक तसेच शिक्षक प्रशिक्षकांना असलीच पाहिजे. कारण जितक्या तत्परतेने हा विषय बी. एड. अभ्यासक्रमात*

*आणला गेला त्याच तत्परतेने त्या विशेष शिक्षकाची पूर्तता करण्यात आली नाही म्हणून हा विषय चर्चेसाठी घेणे अत्यंत महत्वाचा आहे.*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

**कला शिक्षण :** संस्कृतीचे मूल्यमापन त्यांच्या क्ले द्वारे होत असते. अधिकांश संस्कृतींनी तसेच इतिहासाच्या कालखंडानी बालकाच्या शिक्षणात कलेच्या महत्वाला अस्वीकार केलेले नाही. जीवन जगण्याच्या कलेत, शारीरिक, मानसिक, पारिवारिक, आर्थिक, धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजनीतिक समस्यांचे समाधान आणि सुख शांतीमय प्रगतीशील जीवनाची कुंजी आहे. या शिक्षणात आपली स्वतःची एक विशेषता आहे. तसेच आर्थिक दृष्टीने सुद्धा जीवन जगण्याची क्षमता सुद्धा यात आहे. कला, विचार, भावना तसेच अनुभवाची संगीत, नृत्य आणि विविध कलांची एक महत्वपूर्ण व्यवस्थित अभिव्यक्ती आहे. कला व्यक्तीच्या संवेदी, भावनात्मक, बौद्धिक तसेच रचनात्मक क्षमतांचा समृद्ध विकास करते. कला शिक्षण व्यक्तीच्या सुप्त गुणांना विकसित करते. तसेच नवीन कल्पना, विचारांना प्रोत्साहन देते. अर्थात संगीत, नृत्य आणि कला शिक्षण शोध, अन्वेषण, प्रयोग इ. च्या माध्यमातून व्यक्तीचे रचनात्मक तसेच सौंदर्यानुभवास वृद्धिंगत करते. कलेला जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. कलेमध्ये चित्र - दृककला. रेखा, रंगकाम, शिल्प - रूपण कला. श्राव्य - गायन - वादन आणि प्रायोगिक - नृत्य - नाट्य ह्या कलांचा समावेश आहे. म्हणजेच कलेमध्ये दृश्य, रूपण, उपयोजित आणि प्रयोगिक अशा चार प्रमुख क्षेत्रांचा विचार प्रामुख्यान्ये करण्यात येतो. या सर्वच क्षेत्रांत सर्जनशीलतेला समायोजनाच्या दृष्टीने बदल करण्यास भरून संधी आहे. त्यासाठी ह्या क्षेत्रांत आधुनिक माहिती तंत्र विज्ञान युगात जे मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे व नवनवीन ज्ञान - विज्ञान व तंत्र विज्ञान व तंत्र विज्ञानाची दालने खुली होत आहेत त्यांच्या कलाशिक्षकांनी तसेच शिक्षक प्रशिक्षकांनी सतत

अभ्यास करून आपले कलाविषयक ज्ञान अधयावत ठेवावे त्यांचा दैनंदिन कला अध्यापनात उपयोग करून आपल्या विकासाबरोबरच विध्यार्थी शिक्षकांच्या सर्जनशीलतेला वृद्धिंगत करावे.   त्या करीता आपणाला विविध अध्यापन पद्धतींचा तसेच उपक्रमांचा अध्ययन अध्यापनात उपयोग करावा लागेल. आपण ज्या अध्यापन पद्धतींचा उपयोग प्रामुख्याने करतो त्या आणि विषयानुसार त्यात थोडेफार बदल करून त्या पद्धती नव्याने उपयोगात आणाव्या लागतील. कला विषयासाठी त्या कशा उपयुक्त ठरतील ते त्याचा इथे थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

**उद्दिष्टे :** संगीत, नृत्य आणि कला अध्यापनात विविध अध्यापन पद्धतींचा उपयोग करता येणे.

**अध्यापन पद्धती :** संगीत, नृत्य आणि कला अध्यापनात विविध अध्यापन पद्धतींचा उपयोग करतांना आशय लक्षात घेऊनच करावा लागेल.

१. नाट्यीकरण पद्धती : नाट्यीकराणाबद्दल भरतमुनी म्हणतात की,
“ जगात असे कोणतेही ज्ञान, योग, विद्या, कला, शिल्प, शास्त्र नाही की जे नाट्याच्या माध्यमातून सादर करता येणार नाही.”

२. भूमिकाभिनय पद्धती : इतरांच्या परिस्थितीमध्ये तसेच इतरांच्या मनःस्थितीमध्ये स्वतःला ठेवून त्याप्रमाणे व्यक्तीला विचार तसेच कृती करण्याची संधी मिळते.

३. कथन पद्धती : थोड्याच वेळात अनेक प्रकारची माहिती सागण्यास सक्षम असून गोष्टीतील पात्रे, त्यांचे स्वभाव, विशेष भाषा, भाषिक लकबी जाणून घेता येतात.

४. बुद्धिमंथन पद्धती : एखादी समस्या सोडविण्यासाठी पारंपारिक विचार सरणी अपुरी पडते. तेव्हा नव्याने विचार करण्यास सहाय्यक असते.

५. व्याख्यान : विशेष अभ्यासावर आधारित व्याख्यान देऊन विध्यार्थ्यांना प्रेरणा प्रोत्साहन देण्यास उपुक्त ठरते.

६. व्याख्यान - दिग्दर्शन पद्धती : 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले' या संताच्या उक्तीला सार्थक करू शकते.

७. अनुदेशन पद्धती : क्रम, संगती, पायऱ्या, कृती, प्रक्रिया, सूचना इ. स्पष्ट करण्यास तसेच शिस्तीत कार्य होण्यासाठी अत्यंत उपयोगी ठरते.

८. अनुकरण पद्धती : यालाच आपण आरसा असेही म्हणू शकतो कारण आपण जे काही अध्यापन करणार आहोत त्याची प्रतिमा आपल्याला सर्व प्रथम करून त्याची नक्कल करण्यास लावावी लागेल.

९. चर्चा पद्धती : कार्य करण्यापूर्वी तसेच कार्य झाल्या नंतर आपणास त्या कार्या बद्दल साधक - बाधक चर्चा केल्यास कार्य बिनचूक होण्यास तसेच करण्यास मदत होते.

१०. पर्यवेक्षित अभ्यास पद्धती : या द्वारे आपण दिलेले कार्य विध्यार्थी कसे करतात याचे निरीक्षण करता येते.

वरील पद्धतींना पूरक म्हणून विध्यार्थ्यांना चांगले अध्ययन अनुभव देण्यासाठी आपण गटकार्य, क्षेत्र भेटी, स्पर्धा, प्रदर्शने, मेळावे, प्रकल्प, समीक्षण, आढावा आणि समूह संपर्क साधनांचा उपयोग करून संगीत, नृत्य आणि कला अध्ययन - अध्यापन अजून प्रभावी तसेच त्यात जिवंतपणा आणू शकतो.

**कला अध्यापनाचे स्वरूप :** कला अध्ययन - अध्यापनाचे स्वरूप आवशकतेनुसार बदलणे आवश्यक आहे.

संपूर्ण बी. एड. अभ्यासक्रम बदलल्यामुळे संगीत, नृत्य आणि कला अध्ययन - अध्यापनाचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

१. कला विषयामध्ये दृककला, रूपणकला - श्राव्यकला, प्रायोगिक कला अशी अध्ययन क्षेत्रे अपेक्षित आहेत. त्यांच्या अध्ययन - अध्यापन पद्धतीही भिन्न आहेत.

२. विध्यार्थी केंद्रित अध्ययन - अध्यापन पद्धतींचा अवलंब अपेक्षित असल्यामुळे टी लवचिक असेच आशय अध्ययनावर भर देणारी असावी.

३. कला विषयाचे स्वरूप व अध्यापन पद्धती अधिक नाविन्यपूर्ण असाव्यात जसे, ब्लेंडेड लर्निंग, कोऑपरेटीव्ह लर्निंग इ.

४. कला अध्ययन - अध्यापन करतांना प्रात्यक्षिकांचा जाणीवपूर्वक वापर करण्यात यावा.

५. गरजेनुसार एकात्मिक कला अविष्कार अभिव्यक्तींना संधी प्राप्त करून द्यावी.

६. विध्यार्थ्यांच्या कलाकृती या स्वयंपूर्ण व उस्फूर्त होतील यावर भर ध्यावा.

७. विध्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी व्ययक्तिक, छोट्या गटांमध्ये तसेच सामूहिकरीत्या स्वतंत्र उपक्रमांची योजना करावी.

८. कला विषय संदर्भामध्ये वृत्तपत्र, मासिके, इलेक्ट्रोनिक संदर्भसाहित्य साधने, इ. संग्रहित करावीत.

९. कला अध्ययन - अध्यापन प्रक्रिया विध्यार्थ्यांच्या प्रात्याक्षिक स्वरूपाची असल्यामुळे सुसज्ज कलादान असणे आवश्यक आहे. त्या करीता विशेष प्रयत्नशील राहावे.

१०.विध्यार्थ्यांच्या कला अध्ययनाचे मूल्यमापन वेळीस करून त्यांच्या विकसनाची व प्रगतीची त्यांना जाणीव करून द्यावी.

बहुतांशी शिक्षणशास्त्र महाविध्याल्यांमध्ये एकात्मिक अध्यापन करण्याची जबाबदारी शिक्षक प्रशिक्षकांवर सोपविलेली आहे. कला शिकणारा प्रत्येक छात्र शिक्षक हा कलाकारच होईल असे नाही, परंतु सौंदर्याचा आस्वाद घेऊन उत्साह व

आनंद आपल्या जीवनात निर्माण करण्याची कुवत त्याच्यात येईल याची जबाबदारी आपली असेल.

**शिक्षक प्रशिक्षकाची भूमिका :** खालील आकृतीच्या केंद्रस्थानी आपण स्वतःच आहोत अशी कल्पना केल्यास एक कला शिक्षक म्हणून आपणास पुढीलप्रमाणे भूमिका स्पष्ट करून घ्यायला पाहिजे. या भूमिका पाच भागात विभागता येईल.

1. नियोजन :

    1. पद्धतींचे नियोजन
    2. आधार साहित्याचे नियोजन
    3. वेळेचे नियोजन
    4. मूल्यमापन

२. व्यवस्थापन :

    1.कृती निश्चिती करणे
    2.साधनांची मांडणी करणे
    3.कार्याचे व्यवस्थापन करणे
    4.सूचना व नियंत्रण करणे.

३. पुरवठा कर्ता :

    1.आधार
    2.संधी
    3.भाषिक घटक

४. संप्रेषक :

    1.मार्गदर्शन करणे
    2.प्रेरणा देणे
    3.उणीवा भरून काढणे

५. निदानक :

1. कार्याचे पर्यवेक्षण करणे
2. उणीवा शोधून काढणे
3. स्पर्धा घेणे
4. उपचारात्मक योजना ठरविणे.

पारंपारिक अभ्यासक्रमाचा स्वीकार करून आपण कलक्षेत्रातल्या प्रचलित शिक्षणपद्धती, ठरावीक घटक, ठरावीक साचेबंद अभ्यासक्रम आजपर्यंत राबवीत आलो आहोत. आता मात्र जेट युगात वेगाने प्रवेश करताना असे जाणवत आहे की, आपल्याला काळाबरोबर जावयाचे असेल तर आपण आपल्या कार्यपद्धतीच्या दिशा, भावनांचे, कल्पनांचे उदात्तीकरण, सर्जनशीलतेची वृद्धी यांच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत.

हर्बर्ट स्पेन्सर यांच्या 'Education through Art' या विधानाचा अभ्यास, मनन केल्यास 'कला' विषयाची व्यापकता आपल्या लक्षात येईल.

संदर्भ :

गायकवाड शशी (२०१६), '*अध्यापन पद्धती*', नाशिक य. च. म. मू. विद्यापीठ.

जोशी अनंत (२०१६), ' *नाट्य आणि कला शिक्षण* , नाशिक य. च. म. मू. विद्यापीठ.

भंगाळे शैलजा (२०१६), ' *शिक्षणातील नाट्य आणि कला* ', जळगाव प्रशांत पब्लिकेशन्स.

Rajkumar P. (2006) 'Art, Music, Dance and Thearte' New Delhi NCERT.

अखिलेश कुमार, ' *नाट्य एवं कला शिक्षा* ' कोटा, वर्धमान महावीर खुला विश्वविध्यालय.

www.ncert.nic.in